# कॉस्ट मॅनेजमेंट अकाउंटन्सी मध्ये करिअरच्या संधी उपलब्ध - सी.एम.ए. सोहम कवडे

"अनेक विद्यार्थी कॉमर्स नंतर सी.ए. चे करिअर करण्यासाठी प्रयत्न करताना आपणास दिसतात पण त्यासोबतच सी.एम.ए.चे करिअर देखील तितकेच महत्त्वाचे आहे. म्हणून त्याचा अभ्यासक्रम, नोकरीच्या संधी व नोंदणी प्रक्रिया समजून घेऊन विद्यार्थ्यांनी सी.एम.ए. मध्ये करिअर केल्यास त्यांना अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात. भारताच्या आर्थिक प्रगती बरोबर मोठ्या प्रमाणात कंपन्यांची स्थापना होत असून त्यासाठी अनेक सी.एम.ए.ची आवश्यकता असून मागणी जास्त व पुरवठा कमी अशी स्थिती सध्या असल्याने याचा विद्यार्थ्यांनी फायदा घेणे गरजेचे आहे." असे प्रतिपादन सी.एम.ए. सोहम कवडे यांनी केले. ते श्री व्यंकटेश महाविद्यालयात आयोजित ' सी.एम.ए. कोर्सची तयारी आणि परीक्षा पद्धती' या कार्यक्रमात बोलत होते. अध्यक्षीय मनोगतांमध्ये प्राचार्य डॉ. व्ही. ए.माने  म्हणाले, "सी..एम.ए. हा व्यावसायिक कोर्स कॉमर्सच्या विद्यार्थ्यांना अतिशय उपयुक्त असून महाविद्यालयात या कोर्सचे अध्ययन करण्याची सोय करण्यात आली असून मुलांनी या संधीचा लाभ घेऊन आपले उज्वल भवितव्य घडवावे." कार्यक्रमांमध्ये सी.एम.ए. कोल्हापूर चाप्टरचे को.ऑर्डिनेटर श्री. विजय पाटील व त्यांचे सहकारी श्री. संग्राम पाटील यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांची ओळख अकाउंटन्सी असोसिएशनच्या प्रमुख प्रोफेसर (डॉ) एस. एच. आंबवडे यांनी करून दिली. आभार प्राध्यापिका एस.टी. बिरंजे यांनी मानले. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक- शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.


CMA
Shri Venkatesh Mahavidyalaya,
SONY
सारंग दास,इचल.